नियमित फौजदारी खटला क्र.१२२/२०२४.
सरकार/दिनकर
<u>नि.क्र.९</u>

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ याची साक्ष.</u>**

**<u>मी शपथेवर सांगतो कि,</u>**

नाव – अजय अजाबराव जाणे
वय – ४१ वर्ष
धंदा – शेती,
रा. – मदना, ता.नरखेड, जि.नागपूर

**<u>सरतपास विशेष सरकारी अभियोक्ता कुमारी एस.एस.गंगावणे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. मला जलालखेडा पोलिसांनी घटनास्थळ व जप्ती पंच म्हणून हजर राहण्यासाठी लेखी नोटीस दिला नव्हता. मी जलालखेडा पोलिसांसोबत दिनांक २७.०५.२०२४ रोजी घटनास्थळ व जप्ती पंच म्हणून कुठेही गेलो नव्हतो. पोलिसांनी माझ्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त केले नव्हते. पोलिसांनी माझ्यासमक्ष कोणताही घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला नव्हता. आता साक्षीदाराला घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. अुनक्रमांक १ वर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही. सहीला अनुक्रमे **नि.क्र.१० व ११** देण्यात येते.

**(साक्षिदार हा अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने विशेष सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाला साक्षीदाराला उलट तपासामध्ये विचारण्यात येणारे सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात येते.)**

२. हे म्हणने खरे नाही की, दि. २७.०५.२०२४ रोजी मी पोलिसांसोबत मौजा मदना येथील शेत शिवाराजवळ पंच म्हणून गेलो होतो. हे मला माहीती नाही की,

घटनास्थळी आरोपीने फिर्यादीचा विनयभंग केला होता किंवा कसे. हे म्हणने खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला होता. हे म्हणने खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातून हिरोहोंडा कंपनीची काळया रंगाची दुचाकी जीचा नों.क्र.एम.एच.४०सी.एल–३८८६ ही जप्त केली होती. हे म्हणने खरे नाही की, त्यावेळी माझ्यासोबत दुसरा पंच म्हणून दिनेश बिसंदरे हजर होता. हे म्हणने खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला व त्यावर मी वाचून व समजुन सही केली. हे म्हणने खरे नाही की, मी आज आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला**

**उलटतपास आरोपीचे अधिवक्ता श्री.एस.एस.मानकर मार्फत.**

३. उलटतपास नाकारला.

**फेरतपास काही नाही**

**श्रवणोत्तर स्विकृत** **समक्ष**

**(पी.आर.पाटील)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**

**(पी.आर.पाटील)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**

**दिनांक –१२.०३.२०२५**

नियमित फौजदारी खटला क्र.१२२/२०२४.
सरकार/दिनकर
<u>नि.क्र.६</u>

<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ याची साक्ष.</u>

<u>मी शपथेवर सांगतो कि,</u>

| | | |
|---|---|---|
| नाव | – | दिनेश शंकरराव बिसंदरे |
| वय | – | ३९ वर्ष |
| धंदा | – | शेती, |
| रा. | – | बोपापुर, ता.नरखेड, जि.नागपूर |

<u>सरतपास विशेष सरकारी अभियोक्ता कुमारी एस.एस.गंगावणे मार्फत शपथेवर सुरु.</u>

१. मला जलालखेडा पोलिसांनी घटनास्थळ व जप्ती पंच म्हणून हजर राहण्यासाठी लेखी नोटीस दिला नव्हता. मी जलालखेडा पोलिसांसोबत दिनांक २७.०५.२०२४ रोजी घटनास्थळ व जप्ती पंच म्हणून कुठेही गेलो नव्हतो. पोलिसांनी माझ्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त केले नव्हते. पोलिसांनी माझ्यासमक्ष कोणताही घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला नव्हता. आता साक्षीदाराला घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. अुनक्रमांक २ वर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही. सहीला अनुक्रमे **नि.क्र.७ व ८** देण्यात येते.

**(साक्षिदार हा अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने विशेष सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाला साक्षीदाराला उलट तपासामध्ये विचारण्यात येणारे सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात येते.)**

२. हे म्हणने खरे नाही की, दि. २७.०५.२०२४ रोजी मी पोलिसांसोबत मौजा मदना येथील शेत शिवाराजवळ पंच म्हणून गेलो होतो. हे मला माहीती नाही की,

घटनास्थळी आरोपीने फिर्यादीचा विनयभंग केला होता किंवा कसे. हे म्हणने खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला होता. हे म्हणने खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातून हिरोहोंडा कंपनीची काळया रंगाची दुचाकी जीचा नों.क्र.एम.एच.४०सी.एल–३८८६ ही जप्त केली होती. हे म्हणने खरे नाही की, त्यावेळी माझ्यासोबत दुसरा पंच म्हणून अजय जाणे हजर होता. हे म्हणने खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला व त्यावर मी वाचून व समजुन सही केली. हे म्हणने खरे नाही की, मी आज आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला**

**उलटतपास आरोपीचे अधिवक्ता श्री.एस.एस.मानकर मार्फत.**

३. उलटतपास नाकारला.

**फेरतपास काही नाही**

**श्रवणोत्तर स्विकृत** — **समक्ष**

**(पी.आर.पाटील)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**

**(पी.आर.पाटील)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**

**दिनांक –१२.०३.२०२५**

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते कि पुराव्याच्या सदर पि.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा पुराव्याच्या मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

**लघुलेखकाचे नाव**– पी.एच. शिरभाते (श्रेणी–३)